**रे.दि.मु.नं. १८४/२०२२.**
नि.क्र.४८ लगत.
दि.२१.०२.२०२६

**प्रतिवादी क्र. ४ तर्फे साक्षीदार क्र.१ चा शपथेवर जबाब**

नाव :- **रविंद्र कुंडलिक म्हेत्रे**

२०. माझ्या सरतपासातील सर्व मजकूर मला माझ्या वकीलांनी वाचून, समजून सांगितलेला असून तो माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत.

Sd/-

**(एस.ए.विराणी)**

दि. २१.०२.२०२६. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, दौंड, जि. पुणे.

**उलटतपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एस. जी. देशमुख यांच्यातर्फेः-**

२१. माझे शिक्षण बी.ए. पर्यंत झाले आहे. माझी जन्मतारीख दि. ०३.०९.१९८९ आहे. हे म्हणणे खरे आहे की, कुंडलिक लक्ष्मण म्हेत्रे माझे वडील आहेत आणि किसन लक्ष्मण म्हेत्रे माझे चुलते लागतात. हे म्हणणे खरे आहे की, किसनव्यतिरिक्त माधव, साधू आणि दशरथ लक्ष्मण म्हेत्रे अशी अजून तीन चुलते आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सर्व चुलत्यांमध्ये किसन लक्ष्मण म्हेत्रे हे सर्वात मोठे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, किसन म्हेत्रे यांना एकूण तीन मुले आहेत. त्यांची नावे मारुती, दत्ता आणि उत्तम असे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माधव म्हेत्रे यांना दोन मुले नामे सुरेश आणि रमेश आहेत. हे म्हणणे खरे आहे की, साधू म्हेत्रे यांना दोन मुले बाळू आणि संजू अशी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दशरथ म्हेत्रे यांना दिपक हा एक मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांनादेखील मी एकटाच मुलगा आहे.

२२. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत गट नं. ३१७ ही बोरीभडक येथे आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ३१७ चे एकूण क्षेत्र एक हेक्टर ८५ आर आणि पोटखराबा ७ आर असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या मिळकतीवर माझा आणि दिपकचा नाव लागल्यापूर्वी किसन लक्ष्मण म्हेत्रे यांच्या नावावर होती. हे म्हणणे खरे नाही की, ती मिळकत किसन हे कुटुंबाचे कर्ता असल्यामुळे त्यांच्या नावावर होती. साक्षीदार म्हणतो, त्यांची खरेदी मालकीची मिळकत असल्यामुळे

त्यांच्या नावावर होती. हे म्हणणे खरे आहे की, ती मिळकत किसन यांची खरेदीची होती हे दाखविण्यासाठी माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, किसन म्हेत्रे यांच्या मुलांना रानमळामध्ये जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, दोन चुलते महादू आणि साधू यांच्या मुलांना गाडपट्टी येथे जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ३१७ ही आमराईमध्ये स्थित आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. ३१७ ही किसन यांने माझ्या आणि दिपकच्या नावे तहसिलदारसमोरील वाटप तक्ता क्र. हक्कनोंदणी/एसआर/वाटप/३३४/१९९३ दि. ०६.११.१९९३ रोजी करुन दिले होते. साक्षीदार म्हणतो, ही मिळकत आमची खरेदीची आहे. सदर वाटपाचा फेरफार क्र. ८५८ पडल्याचे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरची मिळकत माझी खरेदी मालकीची आहे हे दाखविण्यासाठी माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०६.११.१९९३ रोजी मी आणि दिपक दोघेही अज्ञान होतो. हे म्हणणे खरे आहे की, अज्ञान असल्यामुळे दिपकची आई रेवूबाई दशरथ म्हेत्रे यांचे नाव अज्ञान पालनकर्ता म्हणून लागले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्याचप्रमाणे मी अज्ञान असल्यामुळे माझ्या वतीने माझ्या वडीलांचे नाव अ.पा.क. म्हणून लागले होते.

२३. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद १७ मध्ये नमूद ९५ हजार रुपये खरेदीखतासाठी देण्यासाठी माझ्याकडे उत्पन्नाचे साधन नव्हते. साक्षीदार म्हणतो, सदरची रक्कम माझ्या मामाने माझ्यासाठी दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, मामाबाबतचा मजकूर माझ्या प्रतिज्ञापत्रात नमूद केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखतासाठी मामाने पैसे दिले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादातील गट नं. ३१७ ही वडीलोपार्जित मिळकत आहे. माझी खरेदीखताची नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला दोन आई आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पहिल्या आईचे नाव अंजनाबाई होते. साक्षीदार म्हणतो, कुसूम होते. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई कुसूम ही माझ्या वडीलांची दुसरी पत्नी आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी बहिण संगिता ही अंजनाबाई यांच्याकडून झालेली मुलगी आहे. हे म्हणणे खरे आहे की, कुसूम हिला मी आणि माझी बहिण रुक्मीणी अशी दोन अपत्ये आहेत.

**<u>मध्यांतराची वेळ झाल्यामुळे पुढील उलटतपास तहकूब.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत.

Sd/-
**(एस.ए.विराणी)**
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
दौंड, जि. पुणे.

दि. २१.०२.२०२६.

**<u>उर्वरित उलटतपास मध्यांतरानंतर वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एस. जी. देशमुख यांच्यातर्फेः</u>–**

२४. हे म्हणणे खरे आहे की, संगिता हिच्या लग्नाच्या वेळी दि. ०७.०३.१९८८ रोजी माझा जन्म झालेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र. १५ मधील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादातील गट नं. ३१७ फेरफार क्र. ८५८ अन्वये माझ्या नावे झाली. हे म्हणणे खरे आहे की, तो फेरफार ८५८ हा वाटपाचा फेर म्हणून नोंदविण्यात आलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरची फेरफार नोंद होऊन ३३ वर्षे झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, फेरफार ८५८ आजपर्यंत रद्द करुन घेतलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, किसन म्हेत्रे यांनी माझ्या ताब्यात दिलेली गट नं. ३१७ ही वडीलोपार्जित जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. ३१७ मध्ये मला प्राप्त झालेले क्षेत्र ० हेक्टर ९२.५० आर आणि पोटखराबा ० हेक्टर ३५० आर ही वडीलोपार्जित असल्यामुळे त्यामध्ये माझे वडील, दोन आई आणि दोन बहीणींचादेखील हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीचा आणि इतर प्रतिवादींचा दावा मिळकतीत १/६ हिस्सा नाही हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत.

Sd/–
**(एस.ए.विराणी)**
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
दौंड, जि. पुणे.

दि. २१.०२.२०२६.